# VENUS WORLD SCHOOLS

**Academic year 2021-22**

**Half Yearly Test**

| | |
|---|---|
| **Std – 3rd** | **Date – 29/09/21** |
| **Sub – Marathi** | **Marks – 50** |

**प्र.१ रिकाम्या जागा भरा.** **५ गुण**

अ) नंदीबैल अतिशय ---------- होता .

आ) --------- फाटणार नाही देवा.

इ) संत एकनाथांचा जन्म ---------- मध्ये झाला .

ई) प्रिय आमुचा गौरवशाली --------- महान .

उ) तुझ्या ---------- तुझ्या दयेची किमया अपरंपार .

**प्र.२ एका शब्दात उत्तरे लिहा** **५ गुण**

अ) पाण्यात कोण लपून बसली होती ?

आ) वसुआई कोणाची मनोभावे पूजा करायची ?

इ) राष्ट्रध्वजा मध्ये किती रंग आहेत ?

ई) संत एकनाथ यांना काय म्हटले जाई ?

उ) आपला राष्ट्रीय प्राणी कोणता ?

**प्र.३ कोण कोणास म्हणाले.** **५ गुण**

अ) बेडूकराजा ! मी तुमची माफी मागतो .

आ) मला ही पिशवी भरेल इतके पैसे दे .

इ) नंदी दादा ! पाण्यात उतरू नकोस .

ई) मी तुझ्या भक्तीवर प्रसन्न झालो आहे .

उ) आज किती पुण्य तू माझ्या पदरी घातलेस .

**प्र.४ एका वाक्यात उत्तरे लिहा .** **५ गुण**

अ) संत एकनाथ कोणाला गुरु मानत असे ?

आ) नंदी बैलाने कोणाची माफी मागितली ?

इ) वसुआई पोटापुरते कसे मिळवायची ?

ई) हिरवा रंग कशाचे प्रतिक आहे ?

उ) विदूषकाच्या पट्ट्याला काय अडकवले आहे ?

**प्र.५ योग्य जोड्या लावा** **५ गुण**

| | |
|---|---|
| १. राष्ट्रीय फूल | अ. शांतिब्रम्ह |
| २. राष्ट्रीय पक्षी. | आ. लोभी |
| ३. संत एकनाथ. | इ. कमळ |
| ४. वसुआई. | उ. हंबरडा |
| ५. नंदीबैल. | ऊ. मोर |

**प्र.६ व्याकरण**

अ) **खालील वाक्यांमधून संज्ञा (नाम) ओळखा .** **४ गुण**

१. गंगा पवित्र नदी आहे.

२. भारत माझा देश आहे.

३ हा आहे विदूषक !

४. गीता हुशार मुलगी आहे.

**आ) खालील शब्दांचे वचन बदलून लिहा** **४ गुण**

१. झाड –　　　　३. रस्ता –

२. माणसे –　　　　४. फुले –

**इ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **४ गुण**

१. स्त्री –　　　　३. निर्मळ –

२. सुंदर –　　　　४. स्नान –

**उ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **४ गुण**

१. स्वच्छ ×　　　　३. आनंदी ×

२. आशीर्वाद ×　　　　४. पाळीव ×

**प्र ७ चित्र पाहून पाच ते सहा वाक्य लिहा. ४ गुण**



**प्र. ६ खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. ५ गुण**

चंदा नावाची एक मुलगी होती. ती नदीच्या काठी खेळत होती. खेळता-खेळता तिला तहान लागली. नदी तर आटून गेली होती. तिला वाळूत एक लहान खड्डा दिसला . त्याच्यात थोडे पाणी होते. खड्ड्यातील पाणी ओंजळीत घेऊन ते पिणार तेवढ्यात एक ससा तिच्याजवळ आला. तो खूप तहानलेला होता. थकून गेला होता. ते पाहून तिने पाण्याची ओंजळ त्याच्या तोंडाजवळ धरली. सशाने घटाघटा पाणी पिऊन टाकले व आनंदाने उड्या मारत निघून गेला. चंदाला पण खूप आनंद वाटला.

१. नदीच्या काठी कोण खेळत होते ?
२. लहान खड्डा कोठे होता ?
३. चंदाने खड्ड्यातील पाणी ओंजळीत का घेतले ?
४. घटाघटा पाणी कोणी प्याले ?
५. चंदाला आनंद का झाला ?